# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-९८** **दिनांक - १८/०३/२०२४**

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीतास २४ तासाचे आत अटक करुन, गुन्हा उघडकीस आणण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

दि.१५/०३/२०२४ रोजी विरार पोलीस ठाणेस माहिती मिळाली की, विरार पुर्व परिसरातील नारंगी ते कोपरी जाणाऱ्या कच्च्या रोडचे कडेला एक अनोळखी इसम जखमी अवस्थेत पडलेला आहे. सदरची माहिती मिळताच विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार सदर ठिकाणी पोहचुन पाहणी केली असता, एक अनोळखी इसमाची कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी बोथड हत्याराने वार करुन, निघृण हत्या केली असल्याचे दिसुन आले. सदर मयत अनोळखी इसमाची ओळख पटविण्यासाठी विरार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या अधिकारी व अंमलदारांची वेगवेगळी पथके तयार करुन, घटना ठिकाणच्या परिसराची माहिती घेतली असता, सदर मयत इसमाचे नाव-दिपक उमेश चव्हाण, वय-४० वर्षे, रा.नारायण निवास चाळ, जयश्री नगर, नारंगी गाव, विरार(पु.), असे असल्याची माहिती मिळुन आली. सदर बाबत मयत इसमाचे नातेवाईक- श्री. भवरलाल सुथार, रा.विरार पुर्व यांचे तक्रारीवरुन विरार पो.ठाणेत गु.रजि.नं. I २२०/२०२४, भा.दं.वि.सं. कलम-३०२ प्रमाणे दि.१५/०३/२०२४ रोजी अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

सदर खुनाच्या गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन, मा.वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनांनुसार विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाची लागलीच वेगवेगळी ०४ पथके तयार करुन, मयत इसम राहत असलेल्या परिसर पिंजुन काढुन, तपासाच्या सर्व उपाय योजना राबवुन, मिळालेल्या माहितीचे आधारे इसम नामे. **जयराम शंकर आंबेकर, वय-५५ वर्षे**, रा.विरार पुर्व, ता.वसई, यास ताब्यात घेवुन, त्याचेकडे कसोशिने व कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्याने किरकोळ कारणावरुन झालेल्या वादातुन दगडाने ठेचुन मयत यास जिवे ठार मारल्याची कबुली दिली. सदरच्या गुन्हयात कोणत्याही प्रकारचे कोणतेही धागेदोरे नसतांना, नमुद आरोपीतास २४ तासाचे आत अटक करुन, सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपासा पो.निरी./प्रकाश मासाळ हे करत आहेत.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.सुहास बावचे, तत्का.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.प्रकाश मासाळ, पोलीस निरीक्षक (प्रशासन), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोलीस उप निरीक्षक/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पोहवा/नामदेव ढोणे, व पोअं/सोहेल शेख, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.